

"ज्ञान विज्ञान आणि सुसंस्कार यांसाठी शिक्षण प्रसार"

– शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे



# श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्था

# विवेकानंद कॉलेज, कोल्हापूर

**विषय :- *काही महत्त्वपूर्ण स्तंभालेख, प्रस्तरलेख, ताम्रपत्रांचा ऐतिहासिक अभ्यास.***


**संशोधकाचे नाव :-**

कु. राजश्री सर्जेराव वेनाडे – बी.ए.टी.वाय.

कु. राधिका भगवान मोटे – बी.ए.टी.वाय.

**मार्गदर्शक :-** डॉ. मंजुश्री घोरपडे

डॉ. एस. आर. कट्टीमणी


VIVEKANAND COLLEGE KOLHAPUR (Autonomous) ESTD JUNE 1964

सन २०१८-२०१९

# प्रतिज्ञापत्र

आम्ही बी.ए. भाग तीन मधील इतिहास विषयातील विद्यार्थीनी असून आम्ही काही महत्त्वपूर्ण स्तंभलेख, प्रस्तरलेख, ताम्रपटांचा ऐतिहासिक अभ्यास यामधील "दवितीय चंद्रगुप्त, स्कंदगुप्त वाकाटकसाम्राज्ञी प्रभावतीगुप्ता यांच्या ऐतिहासिक शिलालेखांचा अभ्यास" या विषयावरील पुढील प्रकल्प अहवाल सादर करीत आहे.

षा प्रकल्पात चंद्रगुप्त यांचा मथुरा येथील स्तंभलेख, स्कंदगुप्त याचा जुनागढ प्रस्तरलेख यांचा अभ्यास करून याचा आढावा या प्रकल्पात सादर करण्याचा प्रयत्न करीत आहे.

तसेच या प्रकल्पाच्या माध्यामातून प्राचीनकालीन शिलालेखांची माहिती संदर्भग्रंथाच्या आधार देण्याचा प्रयत्न करत आहे.

| | नाव | सही |
|---|---|---|
| १. | राजश्री सर्जेराव बेनाडे | BSB |
| २. | राधिका भगवान मोटे | RBMote |

VIVEKANAND COLLEGE KOLHAPUR (Autonomous) ESTD JUNE 1964

HOD

विभाग प्रमुख,
इतिहास विभाग,
विवेकानंद कॉलेज, कोल्हापूर (स्वायत्त)

# अनुक्रमणिका


| अ.क्र. | तपशील | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|
| १. | विषयाचे नाव | 1 |
| २. | प्रतिज्ञापत्र | 2 |
| ३. | प्रस्तावना | 3 |
| ४. | उददिष्टे | 4 |
| ५. | गृहीतके | 5 |
| ६. | संदर्भसूची | 20 |


VIVEKANAND COLLEGE KOLHAPUR (Autonomous) ESTD JUNE 1964

# प्रस्तावना

स्तंभलेख आणि ताम्रपट ही प्राचीन इतिहासलेखनातील अभ्यास साधने होती. त्यांच्या आधारे प्राचीन लीपी, भाषा, राजकीय परिस्थिती, समाज, धर्म, वाङ्मय इ. गोष्टींचे ज्ञान मिळते. हे ज्ञानभांडार ब्राम्ही लिपीमध्ये होते आणि ते दीडशे वर्षापर्यंत सर्वस्वी दुर्बोध हाते.

ब्राम्ही लिपी वाचन्याची गुरूकिल्ली जेम्स प्रिन्सेप यांनी शोधून काढली. क्षत्रप राजा रूद्रवामन याचा लेख आहे. त्या खालील स्कंदगुप्ताचा लेख कोरला आहे. ३ मी रूंद आणि २.१० मी रूंदीच्या जागेवर लिहिला आहे. यशोधर्मन यांचा मंदसोर येथे स्तंभालेख आहे. एका कुरूंदच्या स्तंभावर हा लेख कोरला आहे.

VIVEKANAND COLLEGE
ESTD
JUNE
1964
(Autonomous)

# उद्दिष्ट्ये

१. चंद्रगुप्त, स्कंदगुप्त यांच्या शिलालेखांचा आभ्यास करणे.

२. ताम्रपट व शिलालेखातून दिसून येणारे सामाजिक, आर्थिक, राजकीय जीवनाच्या माहितीचा अभ्यास करणे.

३. ताम्रपट व शिलालेखातील भाषा व लिपीचा अभ्यास करणे.

४. ताम्रपट व शिलालेखातील ऐतिहासिक लिखित साधने समजावून घेणे.

VIVEKANAND COLLEGE KOLHAPUR (Autonomous) ESTD JUNE 1964

# गृहीतके

१. गुप्तसम्राट स्कंदगुप्त याचा जुनागढ प्रस्तरलेख यावर ब्राम्ही लिपीचा प्रभाव दिसून येतो.

२. समकालीन भारतील राजांची परधर्म सहिष्णू वृत्ती यामधून दिसून येते.

३. अभ्यासलेला स्तंभलेख व ताम्रपट मधून दक्षिण भारतातील तत्कालीन लिपी विशेषता दिसून येते.

VIVEKANAND COLLEGE KOLHAPUR (Autonomous) ESTD JUNE 1964

# गुप्तसम्राट द्वितीय चंद्रगुप्त यांचा मथुरा स्तंभलेख

## • प्रास्ताविक :-

हा लेख मथुरा येथील रंगेश्वर महादेवाच्या देवळात होता. इ.१९२८ मध्ये वस्तुसग्राहक भोलानाथ यांना तो सापडला. सध्या तो मथुरा यथील संग्राहालयामधये आहे. देवदत्त रामकृष्ण भांडारकर यांनी एपिग्राफिया इंडिया खंड २१, प्र. १-९ मध्ये या लेखावरील संशोधनपर लेख प्रसिद्ध केला. प्रस्तुत लेख ०.६८ मी दगडी स्तंभावर रूंदीच्या आणि ०.४६ मी उंचीच्या जागेवर लिहिला आहे.लेखाचा शेवटचा थोडा भाग नष्ट झाला असून शेवटच्या ओळीत आर्यावृत्त आहे.

## • लिपी :-

हा लखि गुप्तांच्या सुवारूवातीच्या काळतील असल्यामुळे या लेखातील लिपीवर कुषाणकालीन लिपीचा बराच प्रभाव पडलेला दिसून यतो. मथुरा हा कुषाणाचा बालेकिल्ला होता. द्वितीय चंद्रगुप्ताने कुषाणांचे मथुरेतून उच्चाटन केले आणि त्यानंतर हा लेख कोरविला.

VIVEKANAND COLLEGE KOLHAPUR (Autonomous) ESTD JUNE 1964

- **वर्णव्यवस्था :-**

'ख', 'ग', 'ज', 'प', 'व' या अक्षरांची बैठक बसकट असून 'म' आणि 'व' या अक्षरांना कोन आला आहे. त्याचप्रमाणे 'प', 'घ' या अक्षरातील दंडांची उंची सारखी असून ते दंड परस्पर समांतर आहेत. 'य' या अक्षरात डावीकडच्या बाजूस गाठ असलेली दिसून येते. 'क', 'न' आणि 'ण' यांचे आवडते दंड वक्र झाले आहेत.

'र' नंतर येणाऱ्या व्यंजनाचे द्वित्व झाले आहे. एक आणि बारा या ओळीमध्ये जिल्ह्यामूलीयाची खुन आहे.

- **भाषा :-**

लेखाची भाषा संस्कृत आहे.

- **कालनिर्देश :-**

लेखामधये हा असा कालोल्लेख आहे. परंतु 'गुप्त' असा स्पष्ट उल्लेख नाही. प्रथम चंद्रगुप्त याने इ. ३१९-३२० मध्ये गुप्तकालाची स्थापना केली. ६१ या आकड्यानंतरचा काही अंश नष्ट झाला आहे. त्यानंतर 'प्रथमेशुक्ल पंचमी' असा उल्लेख आहे यातील 'प्रथम'हा शब्द महत्त्वाचा आहे. प्रथम या उल्लेखावरून गुप्तसंवत ६१ यावर्षी अधिक

VIVEKANAND COLLEGE KOLHAPUR ESTD JUNE 1964 (Autonomous)

महिना होता हे सूचित होते. परंतु हे गुप्त वर्ष चालू होते की गत होते की गत होते हे मात्र कळावयास मार्ग नाही. स्वामीकन्नु पिळे यांच्या भारतीय कालगणना पंचाण्गात इ. ३८० साली आषाढ महिना अधिक दाखवला आहे. यावरून गुप्त ६१ हा चालू शत होता असे निश्चितपणे म्हणता येईल.

- **विषय :-**

महेश्वर भक्त उदिताचार्य याने 'गुर्वायातना' मध्ये कपिलेश्वर आणि उपमितेश्वर या दोन शिवलिंगाची केल्याचे नमूद आहे. 'गुर्वा यातन' म्हणजे गुरूमंदीर उपमित आणि कपिल ही अनुक्रमे उदिताचार्या चा गुरू आणि गुरूचा गुरू यांची नावे आहेत. यामुळे शिवलिंगाचा अनुक्रमे 'उपमितेश्वर' आणि 'कपिलेश्वर' ही नावे दिली आहेत. भारतीय इतिहासामध्ये शिव किंवा विष्णू यांच्या प्रतिमा स्थापना केल्यानंतर दानकर्त्याचे किंवा त्याच्या माता-पित्याचे त्यास नाव देण्याची प्रथा होती.

- **ऐतिहासिक महत्त्व :-**

या लेखात दानकर्ता उदिताचार्य याने आपली गुरूपरंपरा सांगितली आहे. उपमित हा कपिलाचा शिष्य असून कपिल हा पराशयाचा शिष्य होता. उदिताचार्याचा क्रम पराशयापासून चौथा होता. उदिताचार्य हा

VIVEKANAND COLLEGE ESTD JUNE 1964 (AUTONOMOUS)

कुशिकापासून दहावा होता हे स्पष्ट सांगितले आहे. उपमित पराशर आणि कुशिक यांना 'भगवत' ही उपधी लावली आहे. लाकुल संप्रदायाचा संपादक लकुली याने कायारोपण म्हणजे सध्याचे बडोदा जिल्ह्यातील डभोई तालुक्यातील कार्वाण येथे अवतार घेतला. त्यानंतर त्यास कुशिक, वर्ग, मित्र आणि कौरूष्य हे चार शिष्य मिळाले. लाकुल संप्रदायाविषयीची माहिती चौलुक्य राजा शार्डदेव याच्या सोमनाथ येथील शीलालेखात आहे. हा शिलालेख पोर्तुगालमध्ये सिंत्र येथे आहे. कुशिकाचे शिष्य मथुरेस स्थायिक झाले.

लकुली हा लाकुल संप्रदायाचा संस्थापक होता. या लेखामध्ये या संपदायाच्या काळाविषयी आपणास पुरावा मिळतो. षेथे कुशिकपासून उदिताचार्य हा दहावा शिष्य असल्याचे सांगितले आहे. लेखाचा काळ गुप्तसंवत ६१ म्हणजे इ.३८०-८१ हा येतो. २५ वर्षाची एक पिढी असा हिशेब केला तर लकुलीचा काळ आपल्याला २७५ वर्ष मागे नेता येतो. षाचाच अर्थ लाकुल संप्रदाय इ.१०५ ते १३० या काळाच्या दरम्यान उदयास आला. 'वायुपुराणा' मध्ये ल्कुली हा शिवाचा अवतार सांगितला आहे. लाकुल संप्रदायाचा हा स्तंभलेखातील पुरावा सर्वाति ग्राह्य आणि भक्कम समजला पाहिजे.

प्रस्तुत लेख देवदत्त रामकृष्ण भांडारकर यांनी एपिग्राफिया खंड २१ प्र. ८ मध्ये प्रसिद्ध केला. त्यामध्ये 'गुर्वायतन' शब्दाचे त्यांनी मोठे सुंदर विवेचन केले आहे. 'गुर्वायतन' या शब्दाने मथुरेच्या कुषाणकालीन लेखातील 'देवकुल' या शब्दाची आठवण होते. एका देवकुलामध्ये कुषाण राजा हविष्क याची प्रतिमा स्थापली होती.

VIVEKANAND COLLEGE KOLHAPUR (Aut) ESTD JUNE 1964

मथुरेजवळील माट यथे कुषाण राजाच्या स्मरनार्थ देवकुले उभारली होती. नंतरच्या काळात राठोड वंशातील वीरांच्या स्मरणार्थ राजस्थानमध्ये मंडोर येथे मंदीरे उभारली होती.

आसाच्या प्रतिमा नाटकात 'देवकुल' हा शब्द 'प्रतिमामंदीर' या अर्थी आला आहे. नाटकामध्ये भरत देवकुलिकाला भेटतो. त्यावेळी देवकुलिक त्याला सांगतो की हे पूजास्थान नसून 'प्रतिमामंदीर' आहे. त्या प्रतिमामंदीरामध्ये शेवटचा पुतळा दथरथाचा असतो. दशरथाच्या पुतळ्यावरून भरतास आपला पिता मृत झाल्याचे समजते. प्राचीन भारतात मृताच्या स्मृतर्थ पुतळा उभारणे मंदीर उभारणेया गोष्टी प्रचलित होत्या असे दिसते. उदिताचार्याने आपला गुरू कपिल आणि गुरूचा उपमित यांच्या स्मरणार्थ 'गुर्वायतन' उभारून शिवलिंगाची प्रतिष्ठापना केली. यावरून ही कुषाणकालीन प्रथा पुढेही प्रचलित होती हे स्पष्ट होते.

हा स्तंभलेख साकुल संप्रदायाच्या इतिहासात अतिशय महत्त्वाचा आहे. या लेखातील पुरावा आणि मूर्ती या दोन्ही गोष्टी प्राचीन भारतीय इतिहासात अतिशय मोलाच्या ठरल्या आहेत.

VIVEKANAND COLLEGE KOLHAPUR
ESTD JUNE 1964
(Autonomous)

# गुप्तसम्राट स्कंदगुप्त याचा जुनागढ प्रस्तरलेख

## प्रास्ताविक :-

सौराष्ट्रात जुनागढजवळ गिरनार पर्वताच्या पायथ्याशी एका मोठ्या शिळेवर आशोकाच्या १४ राजाज्ञा कोरल्या आ हेत . त्या शिळेवरच क्षत्रप राजा रूद्रदामन् याचा लेख आहे . त्या खाली स्कंदगुप्ताचा हा लेख कोरला आहे . संबंध लेख ३ मी . रूंद २ .१० मी रूंदीच्या जागेमध्ये लिहीला आहे . २२ व्या ओळीनंतर मात्र दगडाचा काही भाग उडाला असल्यामुळे पुढील ओळी तृटीव आहेत . अक्षरांची उंची २ सेमी आहे .

## लिपी :-

संपूर्ण लेख दक्षिणात्य पद्धतीच्या ब्राम्हणी लिपीमध्ये लिहीला असून रूद्रदामनाच्या लेखातील लिपीपेएक्षा तिचे स्वरूप जास्त सुधारित आहे .

## वर्णव्यवस्था :-

लेखामध्ये अनुस्वाराच्या ऐवजी परसवर्णाचा उपयोग केला आहे . 'र' नंतर आलेल्या व्यंजनाचे द्वीत्व झाले आहे .

VIVEKANAND COLLEGE KOLHAPUR (Autonomous) ESTD JUNE 1964

**भाषा :-**

भाषा संस्कृत असून संबंध लेख काव्यमय आहे.

**कालनिर्णय :-**

लेखामध्ये २६, ३३ आणि ४५ या पदांमध्ये कालगणना गुप्त कालात दिली आहे. गुप्त संवत् १३६ म्हणजे इ.४५५ गुप्त १३७=३ इ.४५६. १३८ = इ.४५७.

**विषय :-**

स्कंदगुप्ताचा हा लेख ऐतिहासिक दृष्ट्या अतिशय महत्त्वाचा आहे. क्षत्रप राजांचा बिमोड करून त्याने सौराष्ट्रात आपले वर्चस्व प्रस्थापित केले. हे या लेखावरून स्पष्ट होते. चंद्रगुप्त मौर्याच्या काळात सुदर्शन नावाचा तलाव बांधला, तो तलाव सम्राट आशोकाने पुष्यगुप्त राज्यपाल असताना मोऱ्या बांधून पक्का केला. त्या तलावाचाच बंधारा क्षत्रप राजा रूद्रदामन याच्या कारकीर्दीत पुन्हा फुटला. क्षत्रप राजा रूद्रदामनाने तो पुनश्व बांधला. त्यानंतर ३00 वर्षांनी स्कंदगुप्ताच्या कारकीर्दीत जनतेवर तोच घोर प्रसंग पुन्हा आला. स्कंदगुप्ताने पुन्हा त्या तलावास बांध घातला. आणि तेथे विष्णूचे देवालय बांधले.

लेखातील २ऱ्या पद्यात इतर राजांना सर्पाची उपमा देऊन गुरूडाने त्यांचे निर्दालन करणारा असे सुंदर बिरूद राजास दिले आहे. गुप्त राजाच्या नाण्यावर लक्ष्मीचेही चित्र आहे. इतर राजपत्रांना बाजूसारून स्कंदगुप्ताच्या गुणसमूदायामूळे लक्ष्मीने त्यास स्वतः वरले आहे. यामध्ये कवीने सुंदर श्लेष शाधलाला आहे. गुप्तांच्या राजशासनामध्ये 'विषय' आणि विषयाचे पालन करणारा अधिकारी 'गोप्ता' या शब्दांचीही

VIVEKANAND COLLEGE KOLHAPUR ESTD JUNE 1964 (Autonomous)

काव्यामध्ये सुंदर गुंफन केली आहे. 'गोप्ता' शब्द ७ व्या पद्यात आहे आणि २४ व्या पद्यात 'विषय' शब्दावर श्लेष आहे. विषय म्हणजे सुखोपभोग आणि दुसरा अर्थ शासन विभाग.

COLLEGE KOLHAPUR ESTD JUNE 1964 (Autonomous)



वाकाटकसम्राज्ञी प्रभावतीगुप्ता हिचा पुणे ताम्रपट.

VIVEKANAND COLLEGE KOLHAPUR ESTD JUNE 1964 (Autonomous)

# वाकाटक साम्राज्ञी प्रभावती गुप्ता हीचा पुणे ताम्रपट

प्रास्ताविक :-

या ताम्रपटाचे २ पत्रे असून त्यांची लांबी २३ सेमी व १४ . ४ सेमी आहे . दोन्ही पत्रे कडीमध्ये घातलेले असून त्या कडीवर मुद्रा आहे . मुद्रेचा आकार लंबवर्तुळाकार असून त्याची लांबी ७ . २ सेमी व रूंदी ५ . ६ सेमी आहे . मुद्रेवर चंद्र सूर्य असून त्या खाली ताकाटकांचे भूषण असलेल्या 'तारसाक्काने राज्यपद मिळवलेल्या मातेचे आणि युवराजाचे हे शासन शत्रूचे पारिपत्य करो' अशा अर्थाचा मजकूर आहे .

लिपी :-

ताम्रपटातील लिपी कीटकशीर्षक आहे . वाटकाटकांचे इतर ताम्रपट पेटिकाशीर्षक लिपीत लिहिले आहेत . हा लेख मात्र कीलकशीर्षक लिपीत आहे .

वर्णव्यवस्था :-

लेखामध्ये 'र' नंतर आलेल्या व्यंजनाचे द्वित्व झालेआहे .

VIVEKANAND COLLEGE KOLHAPUR (Autonomous) ESTD JUNE 1964

भाषा :-

ताम्रपटाची भाषा संस्कृत आहे. ताम्रपटातील पहिल्या २० ओळी व २२ वी ओळ गद्यात आहे. २१ वी आपाशीर्वाची ओळ पद्यात आहे. मुद्रेवरील मजकूरही पद्यात आहे.

कालनिर्देश :-

युवराज राज्य करीत असताना त्याच्या राज्यकालाच्या १३ व्या वर्षी कार्तिक शुक्ल द्वादशीस हे दान्पत्र दिले असा ताम्रपटात उल्लेख आहे. गुप्त राजाची प्रभाव गुप्तेचा वाकाटक युवराज द्वितीय रूद्रसेन याच्याशी विवाह, त्याच्या मृत्युनंतर राणीने केलेले राज्यकारभार या सर्व तत्कालीन ऐतिहासिक घटनांवर या ताम्रपटाचा काळ सर्वसाधारणपणे इ.४१५ ते ४२० हा येईल असे अनुमान करणेस हरकत नाही.

विषय :-

ताम्रपटाची सुरूवात 'दृष्टम्' या शब्दाने झाली आहे. वाकाटक राजा रूद्रसेन याची अग्रमहीशी प्रभावतीगुप्ता हिने हा ताम्रपट दान दिला आहे. प्रभावतीगुप्ता युवराज दिवाकरसेन याची माता असून रूद्रसेनाच्या मृत्युनंतर अल्पवयीन दीवाकरसेनाच्या वतीने ती राज्य करीत होती. प्रस्तुत ताम्रपटात प्रभावतीगुप्ता

COLLEGE KOLHAPUR ESTD JUNE 1964

विष्णू भक्त असल्याचे नमूद केले आहे. दान दिलेले दडून ग्राम सुप्रतिष्ठा हारामध्ये असून त्याच्या पश्चिमेस विलवनक हे गाव, उत्तरेस शीर्ष ग्राम आणि दक्षिणेस कादापिज्जन हे गाव होते. आचार्य चलालस्वामी यास हे गाव दान दिले आहे. लेखाचा कोरक्या चक्रदास आहे.

## ऐतिहासिक महत्त्व :-

प्रभावतीगुप्ता ही वाकाटक सम्राट सम्राट २ च्या रूद्रसेनाची पत्नी वाकाटक राजे ब्राम्हण कुळातील असून त्याचे गोत्र विष्णूवृध्द होते. ते शिव भक्त असून त्यानी 'परममहेश्वर', 'महाभैरवभक्त' अशी बीरूदे घेतली होती. अश्वमेध राजसूय अप्तोयमी इ. यज्ञ त्यांनी केले होते. उलटपक्षी गुप्तराजे विष्णूचे भक्त होते. प्रस्तुत ताम्रपटात ही राणीने स्वत:स 'भगवयीभक्ता' म्हटले असून कार्तिक शुध्द व्दादशीस दान केले आहे. वैष्णवपंतामध्ये एकादशी आणि द्वादशी या दोन्ही तिथी अतिशय पुन्यकारक मानल्या आहेत.

VIVEKANAND COLLEGE KOLHAPUR (Autonomous) ESTD JUNE 1964

# यशोधर्मन् याचा मंदसोर स्तभलेख

**प्रास्ताविक :-**

मंदसोर हे मध्यप्रदेशातील जिल्ह्याचे ठाणे आहे. तेथून आमनेयेस ४ कि.मी. अंतरावर सोडणी या लहान गावात एका कुरूंदाच्या स्तंभावर हा लेख कोरला आहे. हा स्तंभ ऐकूण ११.८ मी उंचीचा असून त्याच्या आयताकृती पायापासून वरील खांबाची उंची १०.४५ मी आहे. हा स्तंभ भंगलेला आहे. त्या काही भाग जमिनीत आहे. उभा असलेला खंडीत भाग गुप्त कालीन आहे. या स्तंभलेखाचे संशोधनात्मक विवेचन कॉरर्पस रान्स्क्रेप्शनम् इंडिकॅरम खंड ३ प्र.१४६ यामध्ये फलिट यांनी केले आहे.

**लिपी :-**

या लेखाची लिपी काही अंशी समुद्रगुप्ताच्या अलाहाबाद प्रसस्तिप्रमाणे असून काही अक्षरे द्वितीय चंद्रगुप्ताच्या मथुरा स्तंभलेखातील लिपीशी मिळती-जुळती आहेत.

VIVEKANAND COLLEGE KOLHAPUR (Autonomous) ESTD JUNE 1964

## वर्णव्यवस्था :-

'र' नंतरच्या व्यंजनाचे द्वित्व झाले आहे. ५व्या ओळीत उपध्मानीयाची खूण आहे. 'र' पूर्वीच्या 'क' आणि 'त' चेही द्वित्व झाल्याचे आढळून येते.

## भाषा :-

लेखातील भाषा संस्कृत आहे व सर्व प्रशस्ती पद्यावत आहे. फक्त शेवटची ओळ गद्यात आहे.

## कालनिर्देश :-

या स्तंभालेखात कालनिर्देश नाही परंतु यशोधर्म्याच्या मंदसोर येथील दुसऱ्या लेखात मालव सवंत् ५८९ (इ.५२३-५३३) हा कालनिर्देश आला आहे. ह्या लेखात विष्णूवर्धनाचा उल्लेख असून ती प्रशस्ती गोविंद नावाच्या कारक्यानेच लिहीली आहे. या प्रशस्तीचाही कोरक्या गोविंदच आहे. यावरून साधारणपणे हा लेख इ.५३२ च्या सुमारास कोरला असावा अनुमान करण्यास हरकत नाही.

VIVEKANAND COLLEGE KOLHAPUR (Autonomous) ESTD JUNE 1964

**विषय :-**

राजा यशोधर्मन् याने ब्रम्हपुत्रा नदीपासून पश्चिम समुद्रापर्यंतचा आणि हिमालयापासून महेंद्रगिरीपर्वत म्हणजे पूर्वघाटापर्यंतचा भाग काबीज केला आणि हूणराजा महिरकूल याचा पराभव केला. या पराक्रमाची नोंद करण्यासाठी हा लेख लिहिला आहे. हा गुणवान राजा शिवाखेरीज कुणापुढे वाकत नव्हता. पुण्यकर्म करण्याच्या या राजाची प्रशस्ती कक्काचा मुलगा वासुल याने रचली आणि गोविंदाने कोरली.

**ऐतिहासिक महत्त्व :-**

भारतीय इतिहासामध्ये हा लेख अतिशय मौलिक ठरला आहे. यशोधर्म्याने गुप्तांच्या वर्चस्वाखाली नसलेलेही प्रांत जिंकून हूणाचा राजा मिहिरकूल याचा पराभव केला. गुप्त सम्राट स्कंदगुप्ताने ज्याप्रमाणे सौराष्ट्रातून क्षपत राजाला हकलले त्याचप्रमाणे यशोधर्म्या ने मध्यभारतातील परकीयांचे वर्चस्व झुगारून दिले.

VIVEKANAND COLLEGE KOLHAPUR ESTD JUNE 1964 (Autonomous)

# संदर्भसूची


१. ओजा गौरी शंकर (१९७७), प्राचीन भारतीय लिपी, मुन्शीलाल मनोहरलाल नवी दिल्ली.

२. खोलते वि.भि. (संपादकीय १९८७) महाराष्ट्रातील काही ताम्रपट आणि शिलालेख- महाराष्ट्र साहित्य आणि सास्कृतिक मंडळ, पुणे.

३. गोखले शोभना (२००७) पुराभिलेखविद्या कॉन्टीनेन्टल प्रकाशक पुणे.

४. डेव शा.भा. (१९८२) महाराष्ट्र व गोवे (शिलालेख ताम्रपटाची वर्णनात्मक सूची) महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळ मुंबई.



VIVEKANAND COLLEGE KOLHAPUR (Autonomous) ESTD JUNE 1964